# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.११/२०२३** **दिनांक २५/०७/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२५/०७/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१६०१/२०२३, दि.२४.०७.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२५/०७/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा.श्री.पी.शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

विषय नं.१ दि.०३.०७.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.४६६ दि.०३.०७.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.२ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. श्री.मच्छिंद्र उत्तमराव आहेर, मदतनीस, साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.४६७/१ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

२. संस्थानतर्फे प्रचलित पध्दतीने सन-२०२४ करीता श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्यादिनदर्शिका प्रकाशित करणेस व साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेसाठी येणा-या छपाई खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४६७/२ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

विषय नं.३ सीसीटीव्ही यंत्रणेसाठी तांत्रिक समितीचे सदस्यतेबाबत.

निर्णय क्र.४६८ Expression of Interest (EOI) प्राप्त झाल्यानंतर तदर्थ समितीपुढे विषय आणता येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविल्यामुळे सदरचा विषय वगळण्यात आला आहे.

(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)

---

विषय नं.४ नवीन दर्शनरांग इमारतीत श्रींचे स्थानिक लाईव्ह दर्शन व्यवस्था सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.४६९ श्रीम भानू कंन्स्ट्रक्शन्स प्रा. लि., मुंबई यांचेकडून या कामासाठी येणा-या खर्चाची रक्कम वसुल / वजा करण्याची तरतुद ठेवावी. मार्केट रेट कोटेशन घेऊन ई-निविदा पध्दतीने उपरोक्त रु.३५ लाख रकमेच्या अधिन राहून प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)

---

**विषय नं.५** **मंदिर व मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी M/s HD Firecon Techno Pvt. Ltd. पुणे यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.४७०** दरवाढ न देता तीन महिने मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात आली.

**(कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.६** **EESL's Energy Efficient Programme अंतर्गत संस्थानचे सर्व इमारती व परिसरामधील दि.११-०२-२००२ पासून ते दि.३१.०३.२०१८ पर्यंतचे खरेदी केलेले / देणगी आलेले सर्व जुने ७० वॅटचे सिलिंग फॅन काढून त्याजागी मे.एनर्जी एफिशिअन्सी सर्व्हिसेस लि,(EESL) यांनी सुचविलेले ३५ वॅटचे BLDC सिलिंग फॅन बसविणेबाबत EESL यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय होऊन मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७१** जवळपास ठिकाणी EESL यांनी सिलिंग फॅन/ए.सी. पुरविले असल्यास त्याची माहिती संस्थानने दयावी जेणे करुन प्रत्यक्ष माहिती व अनुभव मा. अध्यक्ष व सदस्य यांना घेता येईल.

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.७** **संस्थानचे सर्व ठिकाणच्या इमारतीवर अपारंपारिक उर्जेअंतर्गत "रुफ टॉप सोलर पी.व्ही. सिस्टीम प्रकल्प" उभारणी करीता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे दि.०४-०२-२०१८ रोजीचे आदेशास अधिन राहून MAHAPREIT यांची PMC (Project Management Consultant) म्हणून नेमणूक करणेबाबत तसेच त्यांचे दि.३०-०६-२०२३ रोजीचे ई-मेल सोबतचे पत्रातील अ.क्र. ०१ ते ०७ नुसार Transaction advisory service, MAHAPREIT proposes a service charge of 10-14% of project builtup cost बाबत निर्णय होऊन मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७२** **Expression of Interest (EOI)** प्रक्रिया राबवून प्रस्ताव सादर करावा.

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.८** **मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार महाराष्ट्र शासन, मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाची नोंद घेणेबाबत तसेच संस्थानचे आर्थिक हित विचारात घेता निम्नतम निविदाधारक मे.युनायटेड जनसेटस प्रा.लि., औरंगाबाद यांचे दि.१५.०७.२०२३ रोजीचे ई-मेलसोबत प्राप्त झालेल्या पत्रातील खुलाशास अनुसरून मे.युनायटेड जनसेटस प्रा.लि., औरंगाबाद यांना कार्यादेश देणेबाबत.**

निर्णय क्र.४७३ निविदेमध्ये अधिकृत विक्रेत्याकडून सहभाग नोंदविणे अपेक्षीत होते. निम्नतम दरधारक (एल-१) आणि एल-२ हे अधिकृत विक्रेते नसल्यामुळे त्यांना नाकारण्यात येत आहे व एल-३ हे अधिकृत विक्रेता असल्यामुळे आणि एल-१ च्या दरापेक्षा १ रुपयांनी कमी म्हणजे रक्कम रु.३५,५४,९९९/- (सर्व करांसहीत) यामध्ये हे काम करण्यास तयार असल्यामुळे एल-३ यांना मंजूरी देण्यात येत आहे.

दरम्यानचे काळात त्यांनी १८.२.२०२३ पासून सेवा सुरु ठेवल्यामुळे त्या तारखेपासून त्यांना कार्यादेश देण्यात यावा.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.९ संस्थानचे निमगाव को-हाळे येथील हेलीपॅडवर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून लाईट व्यवस्था करणेकामी शिर्डी विमानतळ प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाबाबत.

निर्णय क्र.४७४ आपत्ती कालावधीमध्ये हेलीपॅडचा वापर आवश्यक असतो त्या अनुषंगाने एअरपोर्ट ऑफ इंडिया यांनी प्राधिकृत केलेल्या एजन्सी मार्फत सर्व्हेक्षण करुन अहवालाचे आधारे अंतिम निर्णय घेणे योग्य होईल, असे मा.सदस्य तथा मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी मत व्यक्त केले.

शिर्डी विमानतळावर नाईट लॅण्डींगची व्यवस्था होणार आहे परंतु हेलीकॅप्टर नाईट लॅण्डींगसाठी २४ तासाची पुर्व सुचना दिल्यानंतर व्यवस्था करुन शकतात अशी माहिती शिर्डी विमानतळ प्राधिकरण यांनी दिली.

भविष्यात रुफटॉफवर हेलीपॅडची व्यवस्था नवीन इमारतीवर करता येईल,असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रस्तावात व्यक्त केले. त्यामुळे सध्या तशी व्यवस्था हेलीपॅडला ५९ लाख रुपये खर्च करण्याची गरज नाही, असा अभिप्राय मा.अध्यक्ष महोदय यांनी व्यक्त केला.

आपतकालीन परिस्थीतीमध्ये वैद्यकीय मदतीसाठी संस्थानचे दोन्ही दवाखाने उपलब्ध आहे. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी लक्षात आणून दिली.

उपरोक्त प्रस्तावावर २:१ या बहुमताने असा निर्णय घेण्यात आला की, सध्या हेलीपॅडसाठी एवढा खर्च करण्याची आवश्यकता भासत नाही.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.१० निघोज, निमगाव येथील साईपालखी निवारामधील संस्थानला देणगी मिळालेल्या ०२ इमारतींपैकी सध्या वापरात असलेली “बी” इमारतीमध्ये पॉवर लोडकरीता जनरेटर सेट, कॉम्पॅक्ट सबस्टेशन, मिटरींग क्युबिकल, इलेक्ट्रीकल पॅनल, केबल इत्यादी खरेदी करुन बसविणे तसेच वातानुकूलित यंत्रणा व गिझरकरीता वायरींग करणेकामी निर्णय होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४७५ गरम पाण्यासाठी सोलर सिस्टम वापरावयाची आहे असे गृहीत धरुन त्यासाठी वेगळा प्रस्ताव आणावा, त्यामुळे किती के.व्ही. कमी होणार आहे त्याचा विचार करुन त्याप्रमाणात खर्च कमी करुन प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.११ श्री साईनाथ हॉस्पीटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतींचे वाढीव लोडकरीता मंजुर झालेल्या ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबिकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी कामाचे ई-निविदा तयार करणे तसेच भविष्यात पुढील प्रस्तावित कामकाजाकरीता ०५ वर्षाकरीता विद्युत विभागामार्फत निघणा-या कामांकरीता तज्ञ सल्लागाराची नेमणुक संस्थानचे विहीत पध्दतीने करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७६ तज्ञ सल्लागार नेमणूक करण्याच्या अनुषंगाने धोरण ठरविणेसाठी विविध विभागांचा सर्वसमावेषक प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ मे.वॅटx२) पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्रीबाबतचा करारनामा दिनांक ३०-११-२०२३ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर विज ही मंदिर परिसरातील नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स मधील सबस्टेशनकरीता Captive Open Access द्वारे वापरणे करीता कार्यवाही करणेबाबत तसेच त्याकरीता येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत त्याचप्रमाणे Captive Open Access चे पुढील कार्यवाही बाबत मे. सुझलॉन ग्लोबल एनर्जी लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७७ प्रस्ताव मंजूर. अंदाजे खर्च ५० लाखाचे आत आहे तरी देखील धोरणात्मक निर्णय असल्याने सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१३ संस्थानला माहे डिसेंबर-२०२१ ते जुन-२०२२ या कालावधीमध्ये प्राप्त शुध्द तुपाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेल्या तपासण्यांच्या अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.४७८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.१४ संस्थानला माहे नोव्हेंबर-२०२२ ते फेब्रुवारी-२०२३ या कालावधीमध्ये प्राप्त गाईचे शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेल्या तपासण्यांच्या अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.४७९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.१५ संस्थान निधीतून शिर्डी नगरपरिषद (पुर्वीची नगरपंचायत) हद्दीतील प्रथम प्राधान्यगटातील एकुण ११ रस्ते भूसंपादन/विकसन करणे प्रकल्पाबाबत तसेच या प्रकल्पाचे क्लेमंट ठेकेदार टारमॅट लि. (पुर्वीची रोमन टारमॅट लि.) नवी मुंबई यांचे रु.१९,४३,७५,४०८/-+ व्याज रकमेचे आर्बिट्रेशनबाबत.**

**निर्णय क्र.४८० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१६ श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप शिर्डी येथे १२ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट किंवा १९ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२३ या कालावधीत २४ तास युगा तुलसी फौंडेशन, हैद्राबाद यांचे श्री हनुमान चालीसा जपाच्या आयोजनासाठी परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४८१ परवानगी देता येऊ शकत नाही. प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१७ श्री साईसच्चरित पारायण सोहळा (वर्ष २९ वे) नेहमीचे प्रथा आणि परंपरेप्रमाणे साजरा करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१८ श्री. बाळासाहेब कारभारी जाधव, मदतनीस, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.४८३ श्री. बाळासाहेब कारभारी जाधव, मदतनीस, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांना सेवानिलंबीत करण्यास मान्यता देण्यात आली. त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री. राहूल रामचंद्र इंगावले, सेवा निलंबीत मदतनीस, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत सादर केलेल्या निष्कर्ष अहवालाबाबत मा. तदर्थ समितीचे दि. २२.०३.२०२३ चे सभेतील निर्देशानुसार पारीत केलेला आदेश मा. तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८४** **अवलोकन केले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२०** **श्री. शेखर विजयराव कुलकर्णी, सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत सादर केलेल्या निष्कर्ष अहवालाबाबत मा. तदर्थ समितीचे दि. २२.०३.२०२३ चे सभेतील निर्देशानुसार पारीत केलेला आदेश मा. तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८५** **अवलोकन केले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री. भारत वेणूनाथ लावरे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत सादर केलेल्या निष्कर्ष अहवालाबाबत मा. तदर्थ समितीचे दि. २२.०३.२०२३ चे सभेतील निर्देशानुसार पारीत केलेला आदेश मा. तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८६** **अवलोकन केले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२२** **विनापरवानगी गैरहजर राहणा-या संस्थान अकुशल कंत्राटी/कायम कर्मचा-यांना संस्थान सेवेतून कमी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८७** **या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश विनीयम २०२३ बाबत.**

**निर्णय क्र.४८८** **या विषयासंदर्भात मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४ संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४८९ संबधीत कर्मचारी संघटना यांचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा करुन प्रस्ताव फेर सादर करावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५ सहाय्यक संपादक, साईलीला या पदाबाबत.**

**निर्णय क्र.४९० शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ या शासन निर्णयाप्रमाणे सहाय्यक संपादक, साईलीला या पदाचे मानधन निश्चीत करावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची नवीन सी.बी.एस.ई.शाळा सुरु करणेची प्रक्रिया सुरु करणेकामी तांत्रिक समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा महाविद्यालय Ad-hoc सहा. प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत.**

**निर्णय क्र.४९२ शासनाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.२८ मौजे निमगांव को. येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामाचे ठेकेदार जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडीया प्रा.लि.कोल्हार यांचे मुदतवाढ मागणी व पहिले व अंतिम देयक अदा करणेस मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९३ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या विषयी निर्णय घ्यावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२९** साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतींचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतीचे संडास, बाथरुमचे नुतनीकरण करणे कामासाठी येणारे अपेक्षीत रु.१५,२२,६३,२८१/-इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

**निर्णय क्र.४९४** पीपीटी अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. तहकुब.
(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.३०** व्दारावती भक्तनिवास इमारतीतील खोल्यांचे संडास बाथरुमचे खराब झालेले जूने लाकडी दरवाजे शटर्सऐवजी PVC डोअर शटर्स बसविणे कामाचे ठेकेदार क्रांती कन्स्ट्रक्शन्स, नाशिक यांचे दुसरे व अंतिम देयकाची रक्कम रु.४४,६५,७५९/-मात्र मंजूर होऊन त्यापैकी दुसरे व अंतिम देयकाची निव्वळ देय रक्कम रु.४,०४,१७४/-मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजूरी देणेबाबत.

**निर्णय क्र.४९५** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.३१** शिर्डी परिसरातील संस्थानचे जमीनींना Precast R.C.C. Compound करणेकामी येणारे अंदाजे रु.३,७९,५९,६७०/- मात्र खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४९६** प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.
(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.३२** देणगीदार साईभक्त श्री.बी.विजयकुमार व सी.वनजा रा.हैद्राबाद यांचेमार्फत समाधी मंदिराचे कळसाचे आतील बाजुने व बाहेरील बाजुने सोन्याचा मुलामा देणगी दाखल बसवून देणेबाबत.

**निर्णय क्र.४९७** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मंदिर विभाग)

---

**विषय नं.३३** श्री साईबाबा मंदिरातील श्रींचे समोरील गाभा-यातील संगमरवरी नंदी व खांबाला चांदीचे आवरण देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.

**निर्णय क्र.४९८** फक्त नंदी असलेल्या खांबाला चांदीचे आवरण देणगी स्वरुपात करुन घेण्यास मंजूरी देण्यात आली. नंदीचे स्वरुप आहे तसेच ठेवण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.
(कार्यवाही-मंदिर विभाग)

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा पुण्यतिथी (दसरा) उत्सवाचे वेळी निमंत्रण यादीमध्ये नावे समाविष्ठ करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९९** **धोरण नसल्यामुळे प्रस्ताव नामंजूर.** **(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३५** **आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता वैधानिक लेखापरिक्षण नियुक्तीकामी पात्र लेखापरिक्षण संस्थापैकी ३ लेखापरिक्षण संस्थाची नावे अंतिमत: निवडीकरीता शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५००** **प्रस्तावातील अ.नं.२ ते ४ यांची नावे शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देण्यात आली.**
**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे सन २०१७ ते सन २०२२ अखेर व त्यापुढे दरवर्षी वैधानिक लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०१** **शासनाचे मार्गदर्शन घेऊन कार्यवाही करावी.**
**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे अंतर्गत लेखापरिक्षण 'स्थानिक निधी व लेखापरिक्षा संचालनालयामार्फत' करण्याच्या दृष्टीने संस्थानमध्ये स्वतंत्र कक्ष निर्माण करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०२** **शासनाचे मार्गदर्शन घेऊन कार्यवाही करावी. याकामी पदनिर्मिती बाबतही मार्गदर्शन मागविण्यात यावे.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३८** **दि.०१.०४.२०२३ ते दि.३०.०६.२०२३ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५०३** **प्रस्तावातील ब मधील अ.नं.२७ ध्वजदिन निधी करीता रु.१ कोटी रुपयांची मागणी मंजूर करण्यात आली. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी. इतर मागण्या (प्रस्तावातील अ मधील १ ते ९ व ब मधील १ ते २६ व २८ ते ३४) धोरणाला अनुसरुन नाही म्हणून नामंजूर करण्यात आल्या.**
**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.३९** **साईभक्तांचे सुरक्षिततेकरीता साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व व्दारावती भक्तनिवास येथील निवासस्थान ३ बॅगेज स्कॅनर विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे बैठकीत सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.४०** **सन २०२३-२४ करीता लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागांसाठी ई-निविदा पध्दतीने गाईचे शुध्द तूप खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत गरजेनुसार शुध्द तुपाची मागील पुरवठाधारकाकडून मंजूर दराने शुध्द तुप खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.४१** **पाणी पुरवठा विभागाकरिता उपकार्यकारी अभियंता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व शाखा अभियंता या रिक्त पदावर नेमणूक होणेबाबत.**

**निर्णय क्र.५०६** **प्रतिनियुक्तीवर नेमण्यासाठी शासनाकडे विनंती करावी.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणीसाठी व दोन्ही हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणेसाठी तज्ञ समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०७** **तत्कालीन मा.सदस्य मा.श्री.राजेंद्र भोसले, सदस्य असलेल्या तदर्थ समितीसमोर कॅन्सर हॉस्पिटलचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता त्यावर चर्चा झाली होती त्या माहितीसह प्रस्ताव फेर सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४३** **दवाखान्याच्या कामी मिळालेल्या अॅडव्हान्सची रक्कम माफ करुन मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५०८** **अर्ज नामंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.४४ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, मॅनेजर व ज्युनिअर बायोमेडीकल इंजिनिअर यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका देणे किंवा सदरहू पदांसाठी तसेच आवश्यक रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेबाबत.

निर्णय क्र.५०९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, मॅनेजर व ज्युनिअर बायोमेडीकल इंजिनिअर यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर चार दिवस सेवा खंड देऊन सध्या देत असलेल्या मानधनावर व धर्तीवर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यक रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यास मान्यता देण्यात आली. सी. ए. दाखल करुन मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.१ साई धर्मशाळा, साईआश्रम व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे सध्या कार्यरत आऊटसोर्स ठेकेदारास किमान वेतन कायद्यातील झोन-२ नुसार मुदतवाढ कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.५१० प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-साई धर्मशाळा,साईआश्रम व व्दारावती भक्तनिवास)

-----------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ वा वार्षिक खरेदीमधील X-Ray, CT, MRI Films, Miscellaneous, O.T. Surgical, Neuro O.T., Cathlab and Cardiac O.T. Material करीता दर निश्चिती (Rate Contract) करणेकामी शासनाचे GeM Portal व www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५११ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**वरील निर्णय क्र.४६६ ते ५११ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०७.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारीअधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**